भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.५९० /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/०८/२०१७

**१) मोटार सायकल चालकाने डिवायडरला धडक दिल्याने दोन जखमी . :–**

दिनांक २०/०८/२०१७ चे १८.०० वा. दर. यातील मोटार सायकल आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल वर टिब्बल सिट बसवुन आपले गावाकडे जात असता खरबी येथे एनएच ६ रोड लगत असलेल्या लाईन बोर्डवर लापरवाहीने, हयगयीने चालवुन डिवायडरला धडक मारल्याने जखमी अमिर रोशन भोयर वय १७ वर्ष, व फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी राकेश रमेश नंदागवळी वय २४ वर्ष, रा. खराडा पुर्नवसन मोहाडी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १२८/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आडे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) प्रकृती खराब झाल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १७/०८/२०१७ चे १७.३० वा. पुर्वी. यातील मृतक पतीराम श्रावण बांन्ते वय ६० वर्ष, रा. धोप याला बिपी व श्वासाचा त्रास असल्याने त्यास औषधोपचारा करीता सिटी केअर मल्टीपेशालिटी हॉस्पीटल तकीया वार्ड नागपुर रोड भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक १७/०८/२०१७ चे १८.३० वा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टर चव्हान सी.एम हॉस्पीटलचे मेमो पोस्टे भंडाराचे मेमो वरुन पोस्टेला मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ चे दाखल करुन पोस्टे जा. क्र. ४८३५/१७ दिनांक १९/०८/२०१७ अन्वयचे प्राप्त कागदपत्रावरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परतेती पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**३) पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १९/०८/२०१७ चे १८.०० ते २०/०८/२०१७ चे १२.०० वा. दर. यातील मृतक किसनलाल अर्जुन नारनवरे वय ६५ वर्ष, रा. मोहगाव खदान हा जनावरे चारण्यास गेला असता घरी परत न आल्याने त्याचा इकडे तिकडे शोध घेतला असता मृतकाचा मुलगा सेवानंद नारनवरे यास दिनांक २०/०८/२०१७ चे १२.०० वा. दरम्यान दावेझरी टोला जंगल शिवारातील एका पाण्याचे खड्यात पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी रवि सुकचंद नारनवरे वय ३० वर्ष, रा. दावेझरी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**४) विहीरीत पाण्यात उडी घेवुन बुडुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १९/०८/२०१७ चे २०.०० ते २०/०८/२०१७ चे ७.३० वा. दर. यातील मृतक माधोराव तागु राऊत वय ६५ वर्ष, रा. बाम्हणी मुंडीपार याने पोटाचे आजाराला कंटाळुन स्वत:चे घरासमोरील अंगणातील विहीरीत उडी घेवुन पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी डुलचंद नुकाजी राऊत वय ६५ वर्ष, रा. बाम्हणी मुंडीपार याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. टेभुर्णेकर पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**५) अचानक प्रकृती बिघडल्याने इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १८/०८/२०१७ चे २१.४५ वा. दर. यातील मृतक घनश्याम डोमा गजभिये वय ५५ वर्ष, रा. शहापुर याची अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सा.रु भंडारा येथे नेले असता तेथील डॉक्टरानी मृत घोषीत केल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. जांभुळकर याचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २०/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७२प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१ तीन सिटर वाहनांवरती ०३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६८ केसेस करण्यात आलेल्या आहे.

पोनी. एम. एम. सिडाम
जिवीशा शाखा भंडारा
दुरध्वनी.क्र ८६९८७३९१९६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.